# मुंबई विद्यापीठ

क्र.का.प्रा.वि./ आयसीडी/२०२३-२४/२८९
व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०२३-२४ मधील

## दिनांक २८ डिसेंबर, २०२३ च्या बैठकीचे इतिवृत्त

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सतरावी सभा गुरुवार दिनांक २८ डिसेंबर, २०२३ रोजी सकाळी ११:०० वाजता सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, मुंबई - ४०० ०३२ येथे आयोजित करण्यात आली होती.

बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| अनु. क्र. | माननीय सदस्यांचे नाव | पदनाम | उपस्थिती/ अनुपस्थिती |
|---|---|---|---|
| १ | प्रा. रविंद्र कुलकर्णी ( कुलगुरु) | अध्यक्ष | उपस्थित |
| २ | प्रा. अजय भामरे (प्र-कुलगुरू) | सदस्य | उपस्थित |
| ३ | डॉ. शेषाद्री चारी | सदस्य | उपस्थित |
| ४ | डॉ. अनिल कुमार सिंग (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ५ | डॉ. कविता लघाटे (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ६ | प्रा. शिवराम गर्जे | सदस्य | अनुपस्थित |
| ७ | श्री. संदीप सिंग | सदस्य | अनुपस्थित |
| ८ | सचिव, उच्च व शिक्षण विभाग | सदस्य | अनुपस्थित |
| ९ | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| १० | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| ११ | प्रा. सुनिल भिरूड ( प्रभारी कुलसचिव) | सदस्य सचिव | उपस्थित |
| १२ | श्री. अशोक फळणीकर ( प्रभारी वित्त व लेखा अधिकारी ) | निमंत्रित | उपस्थित |
| १३ | डॉ. प्रसाद कारंडे (प्रभारी संचालक, प.व.मु.मं.) | निमंत्रित | उपस्थित |

**स्वागत** : सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करून मा.अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विंनती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करून सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

**श्रद्धांजली**

**न्या. फातिमा बीबी**

सर्वोच्च न्यायालयातील पहिल्या महिला न्यायमूर्ती आणि तामिळनाडूच्या माजी राज्यपाल फातिमा बीबी यांचे दिनांक २३ नोव्हेंबर, २०२३ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले, मृत्यूसमयी त्या ९६ वर्षांच्या होत्या.

**मधुकरराव चक्रदेव**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जेष्ठ कार्यकर्ते आणि डोंबिवलीतील सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, धार्मिक संस्थाचे मार्गदर्शक, उद्योजक मधुकरराव चर्कदेव यांचे २७ नोव्हेंबर, २०२३ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८२ वर्षांचे होते.

**हेन्री किसिंजर**

शीतयुद्धाच्या काळात अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात महत्वपूर्ण भूमिका बजावलेल्या अमेरिकेचे माजी परराष्ट्रमंत्री, माजी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार आणि शांतता नोबेल पुरस्कार प्राप्त हेन्री किसिंजर यांचे दिनांक २९ नोव्हेंबर, २०२३ रोजी वृद्धपकाळाने निधन झाले.

**दिनेश फडवणीस**

हिंदी मालिका अभिनेते दिनेश फडवणीस यांचे ०४ डिसेंबर, २०२३ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ५७ वर्षांचे होते.

**ज्युनिअर मेहमूद**

प्रसिद्ध विनोदी अभिनेते ज्युनिअर मेहमूद यांचे दिनांक ०८ डिसेंबर, २०२३ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६७ वर्षांचे होते.

**शोभा भागवत**

गरवारे बालभवनाच्या संस्थापिका - संचालिका शोभा भागवत यांचे दिनांक ०८ डिसेंबर, २०२३ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७६ वर्षांच्या होत्या.

**रवींद्र बेर्डे**

मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय ज्येष्ठ अभिनेते रवींद्र बेर्डे यांचे दिनांक १२ डिसेंबर, २०२३ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७८ वर्षाचे होते.

**धर्माण्णा सादूल**

सोलापूरचे माजी खासदार धर्माण्णा सादूल यांचे दिनांक १३ डिसेंबर, २०२३ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८० वर्षाचे होते.

**डॉ. अंजली कीर्तने**

चरित्रकार , संशोधिका, लेखिका डॉ. अंजली कीर्तने यांचे दिनांक १६ डिसेंबर, २०२३ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७० वर्षाच्या होत्या.

**डॉ. प्रभाकर मांडे**

लोकसाहित्याचे गाढे अभ्यासक पद्मश्री डॉ. प्रभाकर मांडे यांचे दिनांक २१ डिसेंबर, २०२३ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९० वर्षाचे होते.

**डॉ. उत्तम पाचारणे**

ज्येष्ठ शिल्पकार व ललित कला अकादमीचे माजी अध्यक्ष डॉ. उत्तम पाचारणे यांचे दिनांक २६ डिसेंबर, २०२३ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६७ वर्षाचे होते.

**श्री. प्रकाश जगन्नाथ वाणी**

माजी समाजकल्याण अधिकारी / मुंबई विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक श्री. प्रकाश जगन्नाथ वाणी यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७५ वर्षांचे होते.

वरील सर्व मान्यवरांच्या दुःखद निधनाबद्दल शोक व्यक्त करून सर्व दिवंगतांना दोन मिनिटे स्तब्ध राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली .

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| १ | २० नोव्हेंबर, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | २० नोव्हेंबर, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले. | |
| २ | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून प्रस्तावित नवीन महाविद्यालयांसाठी सुरु करण्याकरिता इरादापत्र प्राप्त होण्यासाठी इच्छुक संस्था / मंडळ / सोसायटी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्याबाबत. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे क्र. बृहत २०२३/प्र./क्र./५/ वि.शी. ५/ दिनांक २२ सप्टेंबर, २०२३ आणि कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचे क्र. बृहत - २०२३/प्र.क्र.५/वि.शि.-५ दिनांक २ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या पत्रा सोबत असलेल्या प्रपत्राप्रमाणे नविन स्थळबिंदू नविन स्थळ बिंदू , दिलेल्या स्थळबिंदूवर अतिरिक्त अभ्यासक्रम / विद्याशाखा, स्थळबिंदू रद्द तसेच स्थळबिंदू दुरुस्ती देण्यात आलेला आहे. (प्रपत्र-'अ') सदर पत्राच्या अनुषंगाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०२६ मधिल कलम १०९ (३) (क) मधील तरतुदीनुसार बृहत आराखड्याच्या विवरण पत्रातील नविन महाविद्यालये / परिसंस्थासाठी मंजूर स्थळबिंदूनुसार इरादापत्र प्राप्त होण्यासाठी इच्छुक सोसायटी /ट्रस्ट / संस्थांकडून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता विद्यापीठाच्या जाहिरात क्र.(१) संलग्नता / मान्यता / आयसीडी/ २०२३-२४/ २७, दिनांक २५ सप्टेंबर , २०२३, (२) सुधारित - संलग्नता / मान्यता / आयसीडी / २०२३-२४/२११५, दिनांक २६ ऑक्टोबर, २०२३ आणि (३) सुधारित - संलग्नता / मान्यता / आयसीडी / २०२३-२४/२२३९, दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२३ अन्वये प्रस्ताव मागविण्यात आले होते.<br>विद्यापीठातर्फे देण्यात आलेल्या उपरोक्त जाहिरातीस एकूण ६६ इच्छुक सोसायटी / ट्रस्ट / संस्था यांनी प्रतिसाद देऊन प्रस्ताव सादर केले.<br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ तरतुदीनुसार व शासन निर्णय क्र. एनजीसी / २०१७/( २९/१७) /मशि -४ दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ मधील निकषानुसार प्राप्त ६६ प्रस्तावांच्या कागदपत्रांची छाननी व पुनः | |

छाननी करण्यात आली. शासन निर्णय दिनांक १५ सप्टेंबर २०१७ अन्वये मा. कुलगुरू यांनी सादर प्राप्त प्रस्तावावर तज्ञ समिती गठीत करण्यात आली आहे. समिती सदस्यांनी प्रस्तावित महाविद्यालयांना भेटी देऊन अहवाल सादर केले आहेत. एकूण ६६ प्रस्तावांपैकी ०४ सोसायटी / ट्रस्ट / संस्था / यांनी प्रस्ताव मागे घेतले आहेत ( अनु. क्र. ७ , ३२, ४२ व ४६) तसेच एका ट्रस्ट ने शासनाच्या २२ सप्टेंबर २०२३ रोजीच्या पत्रानुसार प्रस्ताव सादर केला होता तदनंतर शासनाच्या दिनांक ०२ नोव्हेंबर २०२३ रोजीच्या पत्राद्वारे नविन अभ्यासक्रमाकरिता पुन्हा नव्याने प्रस्ताव सादर केला होता. त्यामुळे सदर ट्रस्टचे २ प्रस्ताव एकाच प्रस्तावित महाविद्यालयाकरिता असल्याने एकच प्रस्ताव विचारार्थ घेण्याचे प्रस्तावित आहे.

सर्व प्रस्तावित महाविद्यालयाचे इरादापत्र मिळवण्यासाठीचे तज्ञ समितीचे अहवाल दिनांक १६ डिसेंबर २०२३ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठीकीमध्ये बाब क्र. २.१ नुसार ठेवण्यात आला असता ११ संस्थांचे प्रस्ताव पात्र व ४९ संस्थांचे प्रस्ताव अपात्र करण्यात आले. तसेच द साऊथ इंडियन ऑर्गनायझेशन, मालाड यांनी तज्ञ समितीला "आम्हाला जागा उपलब्ध होऊ न शकल्यामुळे आपण भेट देऊ नये असे कळविले असल्याने सदर प्रस्ताव विचारार्थ घेण्यात आला नाही.

२०१७ च्या शासन निर्णयानुसार मा. कुलगुरु महोदयाकडे अपिलासाठी संधी देणात आलेल्या ४९ अपात्र संस्थांनी मा. कुलगुरू समोर अपील सादर केले. त्यातील मा. कुलगुरू महोदयामार्फत ०९ संस्थांचे प्रस्ताव पात्र व ४० संस्थांचे प्रस्ताव अपात्र करण्यात आले.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून प्रस्तावित नवीन महाविद्यालये सुरु करण्याकरिता इरादापत्र प्राप्त होण्यासाठी इच्छुक संस्था / मंडळ / सोसायटी यांच्याकडून प्राप्त झालेले एकूण ६० प्रस्तावांवर तज्ञ समिती अहवाल, अधिष्ठाता मंडळाचे ठराव व मा कुलगुरू महोदयांचा निर्णय या सर्व बाबी मां. व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशी करिता व शासनाकडे सादर करण्याकरिता विचारार्थ ठेवण्यात आले असता व्यवस्थापन परिषदेने असा ठराव पारित केला आहे कि एकूण ४३ प्रस्ताव अपात्र व १७ पात्र प्रस्ताव शासनाकडे शिफारशी सहित सादर करण्याची मान्यता देण्यात यावी.

<table>
<tr>
<td>३</td>
<td>महाविद्यालयांमार्फत विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया निकालापूर्वी पात्र करून घेण्याबाबत.</td>
<td>प्रवेश, नावनोंदणी, पात्रता व स्थलांतर प्रमाणपत्र विभाग</td>
</tr>
<tr>
<td>ठराव</td>
<td>
याबाबत असा ठराव करण्यात आला की,<br><br>
१) महाविद्यालयाने प्रत्येक दिवसाचे दर दिवशी प्रवेश प्रक्रिया (Enrolment) पूर्ण करून त्याच दिवशी अपलोड करावे .<br><br>
२) काही अडचण आल्यावर संबंधितांशी तात्काळ संपर्क करून तक्रार निरसन करावे.<br><br>
३) (जर तक्रारींचे निरसन प्रवेश नाव नोंदणी पात्रता व स्थलांतर प्रमाणपत्र विभाग स्तरावर होत नसेल तर याबाबत खालील पुनरावलोकन समिती निर्णय घेईल (सदर समिती दर आठवड्याला बैठक घेईल.<br><br>
(१) कुलसचिव<br>
(२) संचालक,परीक्षा व मूल्यमापन मंडळ<br>
(३) उपकुलसचिव, (निकाल कक्ष, परीक्षा विभाग)<br>
(४) उपकुलसचिव (प्रवेश, नावनोंदणी, पात्रता व स्थलांतर प्रमाणपत्र विभाग<br>
(५) समन्वयक / बिजनेस अकाउंट मॅनेजर / संगणकीय प्रवेश सहायक बाह्य विभाग (MKCL/ E-Samarth /CCF etc. )
<ul>
<li>प्रवेश प्रकियेस महाविद्यालयाने विलंब केला असल्यास खालील प्रकारे दंड आकारण्यात येईल. अंतिम तारखे नंतर ३० दिवसासाठी किमान दंड ५०००/- रुपये ३० दिवसां पर्यंत.</li>
<li>३० दिवसानंतर प्रति दिन प्रति विद्यार्थी १० रुपये दंड आकारण्यात येईल</li>
</ul>
४) प्रवेशाचे वेळापत्रक<br><br>
पदवी (कला, वाणिज्य, विज्ञान शाखानिहाय नियमित आणि व्यवसायिक
<table>
<tr><td>प्रथम वर्ष (१२ वी निकालानंतर)</td><td>३१ ऑगस्ट, २०२४ पर्यंत.</td></tr>
<tr><td>व्दितीय वर्ष</td><td>३१ ऑगस्ट, २०२४ पर्यंत.</td></tr>
</table>
</td>
<td></td>
</tr>
</table>

| | |
|---|---|
| तृतीय वर्ष | ३१ ऑगस्ट, २०२४ पर्येंत. |

पदव्यूत्तर (एम.ए., एम.कॉम. , एम.एस.सी.)

| | |
|---|---|
| प्रथम वर्ष सत्र -१ आणि सत्र २ | ३० सप्टेंबर, २०२४ पर्यंत |
| व्दितीय वर्ष सत्र -३ आणि सत्र -४ | ३० सप्टेंबर, २०२४ पर्यंत |

विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, व व्यवस्थापनशास्त्र इत्यादी

| | |
|---|---|
| प्रथम वर्ष | ३० सप्टेंबर, २०२४ पर्यंत |
| व्दितीय वर्ष | ३० सप्टेंबर, २०२४ पर्यंत |
| तृतीय वर्ष | ३० सप्टेंबर, २०२४ पर्यंत |
| चतुर्थ वर्ष | ३० सप्टेंबर, २०२४ पर्यंत |

- एम.के.सी.एल.ने महाविद्यालयांच्या तक्रारीचे विहित मुदतीत निरसन करावे. Support System देण्यात आलेली आहे. त्यावर आपली तक्रार नोंदवावी. तक्रारींचे निरसन करण्यात येईल.
- ई-समर्थ च्या तक्रारीबाबत mum.esamarth@gmail.com या email वर संपर्क साधावा.

याबाबत असेही अवगत करण्यात येते कि, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ व शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील अजूनही काही प्रकरणे प्रलंबित आहेत त्यांनी त्या तात्काळ दिनांक १५ जानेवारी २०२४ पर्यंत आणून जमा कराव्यात.

| | | |
|---|---|---|
| ४ | मा. व्यवस्थापन परिषदेने क्रीडा व शारीरिक मंडळात विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विभागातील एक अध्यापक व संलग्न व स्वायत्त महाविद्यालयातील दोन क्रीडा अध्यापकांची निवड करणेबाबत. | विद्यापीठ क्रीडा संकुल |
| ठराव | मा. व्यवस्थापन परिषदेने क्रीडा व शारीरिक मंडळात विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विभागातील एक अध्यापक व संलग्न व स्वायत्त महाविद्यालयातील दोन क्रीडा अध्यापकांची निवड करणेबाबतचे अधिकार मा. कुलगुरूंना देण्यात आले. | |
| ५ | विद्यापीठाच्या सेवेतून सेवानिवृत्त होणारे , स्वेच्छा निवृत्त घेणारे शिक्षकेत्तर | फोर्ट |

| | | |
|---|---|---|
| | अधिकारी/ कर्मचारी तसेच सेवेत असताना आकस्मिक मृत्यू पावलेल्या शिक्षकेत्तर अधिकारी/ कर्मचारी यांच्या वारसांना ५ ग्रॅम सोन्याचे वळे प्रदान करण्यासाठी धोरण ठरविण्याबाबत. | प्रशासकीय विभाग |
| ठराव | सदरहू बाब पूर्ण व्यवस्थापन परिषदेचे गठन झाल्यानंतर पुनःश्च सादर करण्यात यावी. | |
| ६ | संबंधित संस्थने केलेल्या विनंतीनुसार दिनांक ११ ते २३ जानेवारी, २०२४ या कालावधीकरिता (एकूण १३ दिवस) रु. ३,४५,०००/- इतके शुल्क आकारून स्पोर्ट्स एक्स्पोचे आयोजन करण्याकरिता व दिनांक २१ जानेवारी, २०२४ रोजीचे आयोजन करण्याबाबत परवानगी देण्याकरिता पुढील आदेशास्तव सादर. | विद्यानगरी प्रशासकीय विभाग |
| ठराव | सदरहू बाबीसंबंधी विस्तृत चर्चा होऊन असे ठरले कि, उपरोक्त बाबीवर व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक १२ ऑक्टोबर , २०२३ बाब क्रमांक ६ अन्वये मंजुरी देण्यात आली आहे. परंतु महाराष्ट्र शासनाचे पत्र क्रमांक संकीर्ण-३०२२/प्र.क्र.९३/क्रियुसे -१, दिनांक २३ जुन, २०२२ अन्वये शुल्क कमी करण्याबाबत विनंती करण्यात आली होती. सदर कार्यक्रमास ५० एकर जागेसाठी ७५,०००/- प्रति दिन ऐवजी ५०,०००/- प्रति दिन शुल्क आकारण्यात यावे, असे ठरले. हि सूट विशेष बाब म्हणून या वर्षासाठीच देण्यात आल्याचे नमूद करण्यात आले. | |
| ७ | मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांना १० वर्षाची स्वायत्तता देताना आकारावयाच्या संलग्नता शुल्काबाबत एकरूप परिनियम मध्ये दुरुस्ती सुचविण्याबाबत. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | सदर संदर्भात समितीच्या बैठकी झालेल्या नाहीत तसेच सदर बाबी संदर्भात वेळेचा अपव्यय झाल्यामुळे नविन समिती नेमण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. तसेच सदर नविन समितीने आपल्या शुल्क संदर्भातील अहवाल एक महिन्याच्या आत सादर करावा असा ठराव करण्यात आला. | |
| ८ | The matter regarding lien for one more year to Dr. Atul Chaskar, Associate Professor, National Centre for Nano Science Nanotechnology, University of Mumbai. | शैक्षणिक मान्यता व गुणवत्ता हमी |
| ठराव | डॉ. अतुल चासकर, सहयोगी प्राध्यापक, नॅशनल सेन्टर फॉर नॅनो सायन्स नॅनो टेकनॉलॉजी, मुंबई विद्यापीठ यांना तांत्रिक कारणास्तव धारणाधिकार (Lien) | |

| | | |
|---|---|---|
| | नाकारण्यात आला. डॉ. अतुल चासकर, सहयोगी प्राध्यापक, नॅशनल सेन्टर फॉर नॅनो सायन्स टेकनॉलॉजी, मुंबई हे पद व्यपगत करण्यात आले.<br>यापुढे संबंधित विभागाने नियमांची खातरजमा करूनच प्रस्ताव सादर करावे. | |
| ९ | महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. अर्थ सं.-२०२२/प्र.क्र.१०५/(१)/मशि-३,दिनांक २७ मार्च, २०२३ अन्वये उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय महाविद्यालये / संस्था तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शासकीय महाविद्यालये / संस्था तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी अभ्यागत / तासिका तत्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाचे मानधनचे दर सुधारित करण्याबाबत. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. अर्थ सं.-२०२२/प्र.क्र.१०५/(१)/मशि-३,दिनांक २७ मार्च, २०२३ अन्वये उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय महाविद्यालये / संस्था तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शासकीय महाविद्यालये / संस्था तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी अभ्यागत / तासिका तत्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनचे दर सुधारित करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.<br>**परंतु सुधारित दरांचे प्रस्ताव सादर करताना प्रात्याक्षिके आणि सैद्धांतिके यांचे वेगवेगळे रकान्यात** विशिष्ट उल्लेख करून प्रस्ताव सादर करावा. | |
| १० | विद्या परिषदेच्या दिनांक २४ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या सभेमधील बाब क्रमांक ६.२(N), ६.३(N),६.४(A),७.१(N),७.२(N),७.३(N),७.४(N),७.५(N),७.६(N) व ९.१(N) वर केलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ प्रस्ताव सादर | Academic Authorities, Meetings and Services |
| ठराव | विद्या परिषदेच्या दिनांक २४ नोव्हेंबर, २०२३, रोजीच्या सभेमध्ये खालील बाबीवर केलेल्या शिफारशीस मान्यता देण्यात आली.<br>**Faculty of Science**<br>1) 6.2(N) – To Introduce New Programme B.Sc. (Honors) in Information Technology / B.Sc. (Honors with Research) in Information Technology. | |

| | | |
|---|---|---|
| | 2) 6.3(N) – To Introduce New Programme B.Sc. (Honors) in Data Science / B.Sc. (Honors with Research) in Data Science.<br>3) 6.4(A) – Regarding amendment of Credit Structure Regulation No. R. SP-5A for M.Sc. (Physics) (Sem. I & II)<br><br>**Faculty of Commerce**<br>4) 7.1(N) – To Introduce New Programme B.Com. (Honors) in Accounting & Finance / B.Com. (Honors with Research) in Accounting and Finance.<br>5) 7.2(N) – To Introduce New Programme B.Com. (Honors) in Financial Management / B.Com. (Honors with Research) in Financial Management.<br>6) 7.3.(N) – To Introduce New Programme B.Com. (Honors) in Banking & Insurance.<br>7) 7.4 (N) – To Introduce New Programme B.Com. (Honors) in Investment Management / B.Com. (Honors with Research) in Investment Management.<br>8) 7.5(N) – To Introduce New Programme B.Com. (Honors) in Financial Markets / B.Com. (Honors with Research) in Financial Markets<br>9) 7.6 (N) – To Introduce New Programme B.Com. (Honors) in Transports Management / B.Com. (Honors with Research) in Transports Management.<br>10) 9.1(N) – Regulation for the Scheme of Examinations for the UG /PG courses as per NEP 2020. | |
| ११ | विद्यापीठातील शिक्षकेत्तर स्थायी कर्मचाऱ्यांसाठी २०२४-२५ या वर्षांमध्ये "वैद्यकीय गटविमा योजना" कार्यान्वित करण्याबाबत | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | विद्यापीठातील शिक्षकेत्तर स्थायी कर्मचाऱ्यांसाठी २०२४-२५ या वर्षांमध्ये " वैद्यकीय गटविमा योजना " कार्यान्वित करण्याबाबत मान्यता देण्यात आली. विभागाने अटी व शर्ती सुस्पष्ट टाकाव्यात, टेंडर प्रोसेस पारदर्शक असावी जेणे करून भविष्यात कर्मचाऱ्यांना येणाऱ्या तक्रारी व समस्या टाळता येतील. | |
| १२ | विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरातील नव्याने सुरु झालेल्या इमारती मध्ये एकूण ११४ सुरक्षा रक्षकांची नेमणूक शासनाने स्थापन केलेल्या महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळामार्फत करण्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव | मानव संसाधन विकास कक्ष |

| | | |
|---|---|---|
| | सादर. | |
| ठराव | विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरातील नव्याने सुरु झालेल्या इमारती मध्ये एकूण ११४ सुरक्षा रक्षकांची नेमणूक शासनाने स्थापन केलेल्या महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळामार्फत करण्याबाबत मान्यता देण्यात आली. | |
| १३ | शासनमान्य पदाचे लाड पांगे विषयक धोरण हे विद्यापीठ फंडावरील पदांना लागू होते का. याबाबत बाब विचारार्थ सादर. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | लाड पागे विषयक धोरणाबाबतचे / नियुक्त्या शासन निर्णय शासकीय कर्मचाऱ्यासाठीच लागू आहेत त्यामुळे ते विद्यापीठ फंडावरील पदास लागू करता येणार नाही. शासनाची ध्येय धोरणे वेळोवेळी बदलत आहेत त्यानुसार ऑटोनॉमस कॉलेज, क्लस्टर विद्यापीठ या वेगवेगळ्या संकल्पना प्रत्यक्षात अमलात येत आहेत व त्याचा प्रभाव विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांच्या संख्येवरही होत आहे त्यामुळे मुंबई विद्यापीठाशी संलग्नित मोठमोठ्या महाविद्यालयांना ऑटोनॉमस / क्लस्टर विद्यापीठ दर्जा प्राप्त झाल्याने या महाविद्यालयांकडून विद्यापीठास मिळणारे आर्थिक उत्पन्न कमी झालेले आहे. तसेच भविष्यातही यामुळे विद्यापीठाच्या आर्थिक बाबींवर मर्यादा येणार असल्याने सद्यस्थितीत विद्यापीठ फंडावरील लाड-पागे विषयक धोरण / नियुक्त्या विद्यापीठ प्रशासनास न परवडणाऱ्या असल्याने असे निर्णय (विद्यापीठ पदास लाड पागे विषयक धोरणाबाबतचे / नियुक्त्या) विचाराधीन घेता येणार नाही. | |
| १४ | विद्यापीठाच्या विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, आंबडवे, मंडणगड येथील ज्या ११ कुटुंबांनी विद्यापीठास जमीन दान केली अशा कुटुंबातील व्यक्तींना पुन्हा नव्याने हंगामी तत्वावर कामावर घेणेबाबत. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | याबाबत असा ठराव करण्यात आला की आंबडवे, मंडणगड येथील ज्या ११ कुटुंबांनी विद्यापीठास जमीन दान केली अशा कुटुंबातील व्यक्तींना पुन्हा नव्याने हंगामी तत्वावर कामावर घेणेबाबत जोपर्यंत शासन निर्णय येत नाही तोपर्यंत सदर कुटुंबातील व्यक्तींना तीन-तीन महिने मुदत वाढ देण्यात यावी. | |
| १५ | UGC directive may be adopted for renaming UGC Human Resource Development Centre, University of Mumbai as Malaviya Mission Teacher Training Centre, University of Mumbai. | UGC HRDC |
| ठराव | विश्वविदयालय अनुदान आयोगाच्या पत्र क्रमांक D.O.NO.F1- | |

| | | |
|---|---|---|
| | 5/2022(CBC/Faculties)Pt. File, दिनांक ५ ऑक्टोबर,२०२३ अन्वये विद्यापीठाच्या **"UGC Human Resource"** ह्या सेंटरचे **"The Malaviya Mission Teacher Training Centre (MMTTC)"** असे नाव बदलण्याबाबत आदेश देण्यात आले आहे, त्यानुसार नावात बदल करण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली आहे. | |
| १६ | अध्यापक व कर्मचारी तक्रार निवारण समितीच्या पार पडलेल्या विविध बैठकीमध्ये पारित करण्यात आलेल्या २० तक्रारींचे आदेश व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांच्या माहितीकरिता सादर करण्यात येत आहे. | तक्रार निवारण कक्ष |
| ठराव | सदर प्रस्ताव अधिक माहितीसह व्यवस्थापन परिषदेसमोर पुन्हा सादर करावा असे ठरले. | |
| १७ | शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिताचे विद्यापीठातील तंत्रज्ञान विद्याशाखा अंतर्गत येणाऱ्या First Year B.E., M.E., MCA, B.Pharma, M.Pharma, B.Voc and First Year B. Design & Second Year B. Design अभ्यासक्रमाबाबतची सत्र व्यवस्था **(Arrangement of Term)** मान्य करण्याबाबत. | Academic Authorities, Meetings and Services |
| ठराव | असा ठराव पारित करण्यात आला की शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिताचे विद्यापीठातील तंत्रज्ञान विद्याशाखा अंतर्गत येणाऱ्या First Year B.E., M.E., MCA, B.Pharma, M.Pharma, B.Voc and First Year B. Design & Second Year B. Design अभ्यासक्रमाबाबतची सत्र व्यवस्था **(Arrangement of Term)** मंजूर करण्यात आली. | |
| १८ | मुद्रणालयातील कर्मचाऱ्यांच्या पदनामात अंशतः बदल करून सातव्या वेतन आयोगातील पदांशी जुळवून पदोन्नती देण्याबाबत मुंबई विद्यापीठ मुद्रणालय यांचे २४ जानेवारी, २०२३ रोजीच्या पत्रातील मागणीनुसार दिनांक २३ फेब्रुवारी, २०२३ रोजी पार पडलेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकी मधील बाब क्र. १३ वरील ठरावानुसार बाब पुनःश्च सादर. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | याबाबत असा ठराव करण्यात आला कि मुद्रणालयातील कर्मचाऱ्यांच्या पदनामात अंशतः बदल करण्यास मान्यता देण्यात आली. | |
| १९ | फोर्ट परिसरातील दिक्षांत सभागृह / फोर्ट ग्रंथालय आणि राजाबाई टॉवर व त्या बाहेरील लॉन चित्रीकरणासाठी भाडे तत्वावर देण्याबाबत. | फोर्ट प्रशासकीय विभाग |

| | | |
|---|---|---|
| ठराव | सदरहू बाब पूर्ण व्यवस्थापन परिषदेचे गठन झाल्यानंतर पुनःश्च सादर करण्यात यावी. | |
| २० | व्यवस्थापन परिषदेने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७०(३)(ग) नुसार अधिष्ठाता आणि (घ) नुसार निर्वाचित सदस्य स्थायी समितीवर नामनिर्देशित करण्याबाबत. | निवडणूक विभाग |
| ठराव | व्यवस्थापन परिषदेने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७०(३)(ग) नुसार **डॉ. कविता लघाटे** (प्रभारी अधिष्ठाता) यांचे स्थायी समितीवर नामनिर्देशित करण्यात आले. आणि (घ) नुसार निर्वाचित सदस्य स्थायी समितीवर नामनिर्देशित करण्याबाबत निर्णय व्यवस्थापन परिषदेचे पूर्ण गठन झाल्यानंतर घेण्यात येईल असे ठरले. | |
| २१ | श्री. व्यंकटेश्वर कुमार यांनी त्यांना आकारण्यात आलेल्या दंडनीय रकमेचा भरणा केला नसल्याने १२बी/ ४ हा बंगला तात्काळ रिक्त करण्याकरिता विद्यापीठाच्या विधी कक्षा द्वारे त्यांचेबाबत पुढील कायदेशीर कार्यवाही करण्याकरिता मान्यतेस्तव सादर. | विद्यानगरी प्रशासकीय विभाग |
| ठराव | याबाबत सखोल चर्चा करण्यात आली आणि असा निर्णय घेण्यात आला की श्री. व्यंकटेश्वर कुमार यांना घर खाली करण्याच्या दृष्टीने ॲड. युवराज नरवणकर यांच्या मार्फत कायदेशीर नोटीस पाठविण्याची मान्यता देण्यात आली. | |
| २२ (On Table Item) | डॉ. ॲना निकाळजे, प्राचार्य विल्सन महाविद्यालय, मुंबई यांच्या प्राचार्य पदाची पुनर्नियुक्ती (One more term) बाबत विद्यापीठाने गठीत केलेल्या मा. न्यायाधीश शशिकांत सावळे (सेवानिवृत्त) यांच्या समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे विचारार्थ सादर. | शैक्षणिक मान्यता व गुणवत्ता हमी |
| ठराव | डॉ. ॲना निकाळजे, प्राचार्य विल्सन महाविद्यालय, मुंबई यांच्या प्राचार्य पदाची पुनर्नियुक्ती (One more term) बाबत विद्यापीठाने गठीत केलेल्या मा. न्यायाधीश शशिकांत सावळे (सेवानिवृत्त) यांच्या समितीचा अहवाल स्वीकारण्यात आला. पुनर्नियुक्ती (One more term) बाबत व्ही.सी नॉमिनी (VC Nominee) देण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना देण्यात आले. | |
| २३ (On Table Item) | To approve the recommendations of the minutes of Finance and Accounts Committee Meeting dated 27th November 2023 | Finance and Accounts Department |

| | | |
|---|---|---|
| ठराव | The minutes of Finance and Accounts Committee Meeting dated 27th November 2023 were accepted. | |
| २४ (On table Item) | To approve the minutes of the meeting of the Hostel Advisory Committee of University Hostel | Fort Administration Department |
| ठराव | वसतिगृह समितीचे इतिवृत्तावर सविस्तर चर्चा करण्यात आली. व्यवस्थापन सदस्यांनी काही सूचना केल्या. सदर सूचनांचे अवलोकन करून सदर इतिवृत्त मा. कुलगुरूंकडे पुन्हा सादर करावे असे ठरले. | |
| २५ (On table Item) | Recommendation of the Academic Council in its meeting held on 27th December, 2023 vide Item No. 9.5 after consideration and approval of the Management Council , the admission process of Two Year Full Time MHRD Programme in JBIMS from the Academic Year 2024-25 will be through MH-CET or CAT and In Person Assessment (WAT, GA & PI) | Jamnalal Bajaj Institute of Management Studies |
| ठराव | Recommendation of the Academic Council in its meeting held on 27th December, 2023 vide Item No. 9.5, the admission process of Two Year Full Time MHRD Programme in JBIMS from the Academic Year 2024-25 will be through MH-CET or CAT and In Person Assessment (WAT, GA & PI) were accepted. | |
| २६ (On table Item | Recommendation of the Academic Council at its meeting held on 1st November, 2023 vide Item No. 9.5 after consideration and approval of the Management Council regarding the change of Nomenclature in the degree as follows. | Jamanalal Bajaj Institute of Management Studies |

| Sr. No. | Existing Title of Course (Nomenclature) as per University Circular No.UG/1779/2019-20 | Amendment Title of Course (Nomenclature) a per Board of Dean |
|---|---|---|
| 1 | Three Year Part Time MMS (Financial Management) Degree Programme | Time MMS (Financial Management) (Three Year Degree Programme) |
| 2 | Three Year Part Time MMS (Marketing Management) Degree Programme | MMS (Marketing Management) (Three Year Degree Programme) |
| 3 | Three Year Part Time MMS | MMS (Human Resource |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | (Human Resource Development Management) Degree Programme | Development Management) (Three Year Degree Programme) | |
| | | 4 | Three year Part Time MMS (Information Management) Degree Programme | MMS (Information Management) (Three Year Degree Programme) | |

Further the Academic Council has given approval and after the consideration of the Management Council for corrigendum be issued to give the new nomenclature effective in retrospect on the **Mark Sheet** for the Batches 2019-22, 2020-23, and 2021-24 be read as **Three Year Degree Programme instead of Part Time Degree Programme.**

ठराव

Recommendation of the Academic Council at its meeting held on 1st November, 2023 vide Item No. 9.5 after consideration and approval of the Management Council regarding the change of Nomenclature in the degree as follows.

| Sr. No. | Existing Title of Course (Nomenclature) as per University Circular No.UG/1779/2019-20 | Amendment Title of Course (Nomenclature) a per Board of Dean |
|---|---|---|
| 1 | Three Year Part Time MMS (Financial Management) Degree Programme | Time MMS (Financial Management) (Three Year Degree Programme) |
| 2 | Three Year Part Time MMS (Marketing Management) Degree Programme | MMS (Marketing Management) (Three Year Degree Programme) |
| 3 | Three Year Part Time MMS (Human Resource Development Management) Degree Programme | MMS (Human Resource Development Management) (Three Year Degree Programme) |
| 4 | Three year Part Time MMS (Information Management) Degree Programme | MMS (Information Management) (Three Year Degree Programme) |

Were accepted.

| | | |
|---|---|---|
| २७ (On table Item) | मे. चिंतामणी बेरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांच्याकडून स्वच्छतेचे काम करून घेण्यास मुदतवाढ देण्याबाबत . | फोर्ट प्रशासन विभाग |

| | | |
|---|---|---|
| ठराव | याबाबत असा ठराव करण्यात आला की मे. चिंतामणी बेरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांच्याकडून स्वच्छतेचे काम करून घेण्यास ३१ मार्च २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. सहकारी संस्था मर्यादित यांच्याकडून स्वच्छतेचे काम करून घेण्यास इ-टेण्डर प्रक्रिया सुरु करण्या-स मान्यता देण्यात आली कॅम्पस प्रमाणे कामाची विभागणी करावी.<br>१) कालिना परिसर (कुलगुरू निवासस्थान, अकॅडमिक इमारती, इतर सर्व प्रशासकीय व शैक्षणिक विभागाच्या इमारती, सर्व वसतिगृहे,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वसाहतीतील बाहेरील भाग इ.)<br>२) साऊथ मुंबई (प्र-कुलगुरू निवासस्थान, कुलसचिव निवासस्थान, शारीरिक शिक्षण व क्रीडा संकुल विभाग, जमनालाल बजाज इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, सर्व वसतिगृहे, फोर्ट प्रशासकीय इमारत, ग्रंथालय, दीक्षांत सभागृह इ.)<br>३) ठाणे ,रत्नागिरी, कल्याण सब सेन्टर.<br>वरील ठिकाणी स्वच्छतेची कामे करणे संबंधी ई - टेंडर (e - tender) प्रक्रिया राबविण्यात यावी. संबंधित प्रक्रिया ३१ मार्च पर्यंत पूर्ण करण्यात यावी ,याबाबत संबंधित उपकुलसचिव जबाबदारी घेतील. ई - टेंडर प्रक्रियेबाबत खालील समिती गठीत करण्यात आली व त्यात बदल करावयाचे अधिकार मा. कुलगुरूंना देण्यात आले.<br>१) प्रा. कविता लघाटे. (प्रभारी अधिष्ठाता)<br>२) प्रा. बी.एन. चौधरी. (प्राचार्य, एस.पी.आय.टी)<br>३) डॉ. उमेश कोकाटे (सिस्टिम मॅनेजर,डी.टी.ए.)<br>४) मैनुद्दीन शेख (उपकुलसचिव, वित्त व लेखा विभाग)<br>५) सुजाता नवाले (उपकुलसचिव, फोर्ट प्रशासन विभाग)<br>६) श्री. अशोक घुले ( उपकुलसचि, कालीना प्रशासकीय विभाग)<br>वरील चर्चे दरम्यान विद्यापीठांतर्गत येणारे कॅन्टीन व मेस सुविधांचे ई - टेंडर करणे आवश्यक असल्याचे निर्देशनास आले तरी या संदर्भात सदर समिती विद्यापीठांतर्गत येणाऱ्या सर्व कॅन्टीन व मेस ह्यांची ई - टेंडर प्रक्रिया सुद्धा पार पाडेल. | |
| २८ (On table Item | विद्यापरिषदेच्या दिनांक २७ डिसेंबर, २०२३ रोजीच्या सभेमधील बाब क्रमांक 5.1(N), 5.2(N), 5.3(N),5.4(N), 5.5(N), 5.6(N), 5.7(N), 5.8(N),5.9(N) ,5.10(N), 5.11(N), 5.12(N), 5.13(N), 5.14(N), 5.15(N), 5.16(N), 5.17(N), 5.18(N), 6.1(N), 6.1(N), 6.2(N), 6.3(N), 6.4(N), 6.5(N), 6.6(N), 6.7(N), 6.8(N), 6.9(N), 6.10(N), 6.11(N), 6.12(N), 7.1(N), 7.2(N), 7.3(N), 7.4(N), 7.5(N), 8.1(N), 8.2(N) आणि 9.1 व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ प्रस्ताव सादर. | Academic Authorities, Meetings and Services |

| | | |
|---|---|---|
| ठराव | विद्या परिषदेच्या दिनांक २७ डिसेंबर, २०२३ रोजीच्या सभेमध्ये खालील बाबीवर केलेल्या शिफारशीस मान्यता देण्यात आली.<br><br>**Faculty of Humanities**<br><br>1) 5.1 (N) – to introduce New Programme B.A. (Honours) in Hindi / B.A. (Honours with Research) in Hindi Sem I & II<br>2) 5.2 (N) – to introduce New Programme B.A. (Honours) in Gujarati / B.A. ( Honours with Research) in Gujarati Sem I & II<br>3) 5.3 (N) – to introduce New Programme B.A. (Honours) in Marathi / B.A. (Honours with Research) in Marathi Sem I & II.<br>4) 5.4 (N) – to introduce New Programme B.A. (Honours) in English / B.A. (Honours with Research) in English Sem I & II.<br>5) 5.5 (N) - to introduce New Programme B.A. (Honours) in Pali / B.A. (Honours with Research) in Pali Sem I & II.<br>6) 5.6 (N) - to introduce New Programme B.A. (Honours) in Islamic Studies / B.A. (Honours with Research) in Islamic Studies Sem I & II.<br>7) 5.7 (N) - to introduce New Programme B.A. (Honours) in Psychology / B.A. (Honours with Research) in Psychology Sem I & II.<br>8) 5.8 (N) - to introduce New Programme B.A. (Honours) in Psychology / B.A. (Honours with Research) in Psychology Sem I & II.<br>9) 5.9 (N) – to introduce New Programme B.A. (Honours) in History / B.A. (Honours with Research) in History Sem I & II.<br>10) 5.10 (N) - to introduce New Programme B.A. (Honours) in Politics / B.A. (Honours with Research) in Politics Sem I & II.<br>11) 5.11 (N) - to introduce New Programme B.A. (Honours) in Philosophy / B.A. (Honours with Research) in Philosophy Sem I & II.<br>12) 5.12 (N) - to introduce New Programme B.A. (Honours) in Arabic / B.A. (Honours with Research) in Arabic Sem I & II.<br>13) 5.13 (N) - to introduce New Programme B.A. (Honours) in Persian / B.A. (Honours with Research) in Arabic Sem I & II.<br>14) 5.14 (N) - to introduce New Programme B.A. (Honours) in Urdu / B.A. (Honours with Research) in Urdu Sem I & II.<br>15) 5.15 (N) - to introduce New Programme B.A. (Honours) in Sindhi / | |

| | | |
|---|---|---|
| | B.A. (Honours with Research) in Sindhi Sem I & II.<br>16) 5.16 (N) - to introduce New Programme B.A. (Honours) in Culinary Arts / B.A. (Honours with Research) in Culinary Arts Sem I & II.<br>17) 5.17 (N) - to introduce New Programme B.A. (Honours) in Multi Media & Mass Communication / B.A. (Honours with Research) in Multi Media & Mass Communication Sem I & II.<br>18) 5.18 (N) - to introduce New Programme B.A. (Honours) in Extension Work / B.A. (Honours with Research) in Extension Work Sem I & II.<br><br>**Faculty of Science and Technology**<br>19) 6.1 (N) - to introduce New Programme B.Sc. (Honours) in Physic / B.Sc. (Honours with Research) in Physic Sem I & II.<br>20) 6.2 (N) - to introduce New Programme B.Sc. (Honours) in Chemistry / B.Sc. (Honours with Research) in Chemistry Sem I & II.<br>21) 6.3 (N) - to introduce New Programme B.A./B.Sc. (Honours) in Mathematics / B.A./B.Sc. (Honours with Research) in Mathematics Sem I & II.<br>22) 6.4 (N) to introduce New Programme B.Sc. (Honours) in Bioanalytical Sciences / B.Sc. (Honours with Research) in Bioanalytical Sciences Sem I & II.<br>23) 6.5 (N) - to introduce New Programme B.Sc. (Honors) in Life Science / B.Sc. (Honors with Research) in Life Science Sem I & II<br>24) 6.6 (N) - to introduce New Programme B.A./B.Sc. (Honors) in Statistics / B.A./B.Sc. (Honors with Research) in Statistics Sem I & II<br>25) 6.7 (N) - to introduce New Programme B.Sc. (Honors) in Botany / B.Sc. (Honors with Research) in Botany Sem I & II<br>26) 6.8 (N) - to introduce New Programme B.Sc. (Honors) in Computer Science / B.Sc. (Honors with Research) in Computer Science Sem I & II<br>27) 6.9 (N) - to introduce New Programme B.Sc. (Honors) in Zoology / B.Sc. (Honors with Research) in Zoology Sem I & II<br>28) 6.10 (N) - to introduce New Programme B.Sc. (Honors) in Microbiology / B.Sc. (Honors with Research) in Microbiology Sem I & II | |

29) 6.11 (N) - to introduce New Programme B.Sc. (Honors) in Bio-Chemistry / B.Sc. (Honors with Research) in Bio-Chemistry Sem I & II

30) 6.12 (N) - to introduce New Programme B.Sc. (Honors) in Forensic Science / B.Sc. (Honors with Research) in Forensic Science Sem I & II

**Faculty of Commerce and Management**

31) 7.1 (N) - to introduce New Programme B.Com. (Honors) in Commerce / B.Com. (Honors with Research) in Commerce Sem I & II

32) 7.2 (N) - to introduce New Programme B.Com. (Honors) in Accountancy / B.Com. (Honors with Research) in Accountancy Sem I & II

33) 7.3 (N) - to introduce New Programme B.Com. (Honors) in Business Economics / B.Com. (Honors with Research) in Business Economics Sem I & II

34) 7.4 (N) - to introduce New Programme B.Com. (Honors) in Business Management/B.Com.. (Honors with Research) in Business Management Sem I & II

35) 7.5 (N) - to introduce New Programme (Honors) in Bachelor of Management Studies/(Honors with Research) in Bachelor of Management Studies Sem I & II

**Faculty of Interdisciplinary Studies**

36) 8.1 (N) - to introduce New Programme B.A. (Honours) in Geography / B.A. (Honours with Research) in Geography Sem I & II

37) 8.2 (N) - to introduce New Programme Bachelor of Social Works (Honours) / Bachelor of Social Works (Honours with Research) Sem I & II

38) 9.1 – महाराष्ट्र स्टुडंट्स युनियन, युवा सेना, माननीय आमदार श्री. जितेंद्र आव्हाड तसेच इतर विद्यार्थी संघटना इत्यादींच्या माध्यमातून व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या परंतु पुढील वर्षात प्रवेशास अपात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना एक विशेष संधी म्हणून पुढील वर्षात प्रवेश देण्यास पत्र करण्याविषयीची मागणी करण्यात आली होती. सदर मागणी विचारार्थ प्राधिकरणापुढे ठेवण्यात आली. या विषयावर प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये सविस्तर चर्चा झाली. विद्या परिषदेमध्ये विविध विषयांचे अभ्यास मंडळांचे प्रमुख, अधिष्ठाता, महाविद्यालयाचे प्राध्यापक तसेच प्राचार्य यांनी सविस्तर चर्चा केली. व्यावसायिक अभ्यासक्रमांची अभ्यास पद्धती,

| | | |
|---|---|---|
| | त्यासाठी लागणारे व्यावसाईक ज्ञान, खालील वर्गातील विषयांचे ज्ञान, तसेच व्यावसायिक कौशल्ये यांची विद्यार्थांना त्यांच्या भविष्यातील वाटचालीसाठी असणारी नितांत गरज यावर सांगोपांग चर्चा झाली. व्यावसायिक अभ्यासक्रमांचे इतर अभ्यासक्रम पासूनचे वेगळेपण विद्यार्थ्यांना विशेष व्यावसायिक संधी उपलब्ध करून देतात त्यामुळे या विद्यार्थ्यांना विशेष क्षमता असणे गरजेचे असते, अशा प्रकारचे विचार माननीय सदस्यांनी व्यक्त केले. तसेच मुंबई विद्यापीठाच्या पदवीला व्यावसायिक क्षेत्रात विशेष महत्व असून अशा प्रकारची संधी देणे उचित होणार नाही असे, सर्व सदस्यांचे मत पडले. तसेच सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांचे हिवाळी सत्र संपले असून बहुतेक परीक्षा पार पडल्या असून काही निकालही जाहीर झाले आहेत. अशा परिस्थितीमध्ये विद्यार्थांच्या मागण्या मान्य करता येणार नसल्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. | |
| २९ (On table Item) | As recommended by the Academic Council the item is, therefore, being placed to the Management Council for its approvals to arrange for Convocation for the year 2023, for conferment of Degrees in different courses of various faculties, so also, autonomous departments of the University and autonomous Colleges/ Institutions. | Board of Examinations and Evaluation |
| ठराव | With reference to the recommendation of the academic council of the University, the management council has sanctioned it's approval for the conduct of convocation for the year 2023. | |
| ३० (On table Item) | व्यवस्थापन हस्तांतरण करण्यासंदर्भात अजित बाविस्कर, शासनाचे उप सचिव उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांच्या दिनांक १५ डिसेंबर, २०२२ चे एकरूप परिनियम क्रमांक -१ मधील (३) नुसार विधी सल्लागार, ॲड. रुई रॉर्डीक्स यांनी दिलेल्या जाहिरातीचा मसुदा मान्य करण्यात यावा आणि सदर जाहिरात देण्यासंदर्भात संस्थेकडून खर्च घेण्याबाबत | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | याबाबत असा ठराव करण्यात आला की ॲड. रुई रॉर्डीक्स यांनी दिलेल्या जाहिरातीचा मसुदा मान्य यावा आणि सदर जाहिरात देण्यासंदर्भात संस्थेकडून खर्च रुपये २५,०००/- (पंचवीस हजार फक्त) घेण्यात यावे. | |
| ३१ (On table Item) | मा.औद्योगिक न्यायालयातील व मा. उच्च न्यायालयातील याचिकांचे निकाल हे वेगवेगळे येत असल्यामुळे या सर्व याचिका मा. सर्वोच्च न्यायालयातील याचिकेसोबत टॅग कारणेबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | मा.औद्योगिक न्यायालयातील व मा. उच्च न्यायालयातील याचिकांचे निकाल हे | |

| | | |
|---|---|---|
| | वेगवेगळे येत असल्यामुळे या सर्व याचिका मा. सर्वोच्च न्यायालयातील याचिकेसोबत टॅग करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेने मान्यता देण्यात आली. | |
| ३२ (On table Item) | To read and approve the minutes of Finance and Accounts Committee Meeting held on 27th December, 2023 under Section 94(2) of the Maharashtra Public Universities Act, 2016. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव | वित्त व लेखा समितीच्या दिनांक २७ डिसेंबर,२०२३ रोजीच्या संपन्न झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. | |

कुलसचिवांनी अध्यक्षांचे आभार मानून त्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

कुलसचिव (प्र)

प्र- कुलगुरू

मा. कुलगुरू

Registrar to sign on each page.